# घोषणा

## महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा 2017
## उमेदवारांनी त्यांचा नेमका संवर्ग नोंदविणेबाबत.

प्रस्तुत परीक्षेसंदर्भात दि. १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणेकडे उमेदवारांचे लक्ष वेधण्यात येत आहे. यानुसार ज्या उमेदवारांच्या, ते नेमक्या कोणत्या प्रवर्गात कार्यरत आहेत याची स्पष्ट माहिती प्राप्त झालेली नव्हती, त्यांना ते ज्या संवर्गात कार्यरत आहेत ( महाराष्ट्र शिक्षणसेवा, गट-क किंवा जिल्हा तांत्रिक सेवा गट-क यापैकी एक ) त्या संवर्गाचा व पदाबाबतची माहिती दि. २२/१०/२०१७ पर्यंत पाठविण्यास सूचित करण्यात आले होते. तथापि काही उमेदवारांकडून अद्याप ही सदर माहिती प्राप्त झालेली नाही. तरी ज्या उमेदवारांनी सदर माहिती अद्याप पाठविलेली नाही अशा उमेदवारांना सदर माहिती **दि. २६/१०/२०१७** पर्यंत mpscd13b@gmail.com या ई-मेल आयडीवर आयोगास त्वरित पाठवावी.

**उपरोक्त तारखेनंतर कळविलेली माहिती आयोगातर्फे स्विकारली जाणार नाही व अशा उमेदवारांची प्रस्तुत परीक्षेची उमेदवारी त्यांनी अर्जात माहिती योग्य प्रकारे नमूद केलेली नाही या कारणास्तव रद्द करण्यात येईल, याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

ठिकाण : मुंबई
दिनांक : 23 ऑक्टोबर, 2017

**सु. सं. केसरकर**
**उपसचिव (परीक्षा)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**